**सजीव सृष्टीच्या अस्तित्वासाठी ओझोनचे संवर्धन ही काळाची गरज- डॉ. एस के माने.**

पृथ्वीवरील सजीव सृष्टीच्या अस्तित्वासाठी ओझोन वायूचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन डॉ. एस के माने यांनी केले. ते कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात आयोजित केलेल्या १६ सप्टेंबर या जागतिक ओझोन संरक्षण दिनाच्या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ओझोन अवक्षय आणि पर्यावरण या विषयावर बोलत होते. सदर कार्यक्रम पदवी व पदव्युत्तर भूगोलशास्त्र विभागाने आयोजित केला होता.

ओझोन दिन हा पर्यावरणासाठी एक अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. लोकांना ओझोनच्या थराचे जतन करण्यासाठी शक्य ते उपाय शोधण्यासाठी 'जागतिक ओझोन दिन' दरवर्षी 16 सप्टेंबरला साजरा केला जातो. ओझोन थराबद्दल लोकांमध्ये जागरूकता पसरवण्यासाठी आणि ते टिकवण्यासाठी संभाव्य उपाय शोधण्यासाठी आणि वातावरणातील ओझोनचे सुरक्षा कवच राखून ठेवण्यासाठी हा दिवस लक्षवेधी ठरतो. जागतिक ओझोन दिवस साजरा करण्यामागील संकल्पना लोकांना ओझोनच्या थराविषयी जागरूक करणे आणि खराब झालेल्या ओझोन थराची जाणीव करून देणे आहे. 19 डिसेंबर 1964 रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने ओझोन थराच्या संरक्षणासाठी 16 सप्टेंबर हा जागतिक ओझोन दिवस म्हणून घोषित केला. भारताने १९९२ मध्ये मॉंट्रिऑल करारावर स्वाक्षरी केली आहे.

ओझोन थर सूर्यापासून उद्भवणाऱ्या हानिकारक अल्ट्रा व्हायलेट किरणांपासून पृथ्वीचे रक्षण करतो. सूर्यापासून निघणाऱ्या या किरणांमुळे त्वचेचे अनेक आजार उद्भवू शकतात. दिवसेंदिवस वाढणारे प्रदूषण आणि वृक्षतोड यामुळे पृथ्वीच्या वायुमंडलातील हा थर डॅमेज होत आहे. जी संपूर्ण जगासाठी धोक्याची घंटा आहे. सूर्याच्या हानिकारक किरणांमुळे अनेक रोग आणि समस्या उद्भवू शकतात, ज्याला फक्त ओझोन थरच थांबवू शकतो.परंतु मानवनिर्मित प्रदूषणामुळे ओझोनचा थर दिवसेंदिवस कमी होत आहे. जो पर्यावरणाला विनाशकारी ठरू शकतो यामुळेच ओझोन थराचे महत्त्व, संरक्षण यासंदर्भात जागृती करणे आणि संपूर्ण पर्यावरणाचे व पर्यायाने पृथ्वीचे संरक्षण करणे. सीएफसीच्या उत्पादनास प्रतिबंध घालणे, त्यांचे उत्पादन कमी करणे किंवा त्याला पर्यायी रसायने शोधणे इ. उपायोजना हि आपल्या सर्वांची जबाबदारी आहे असे प्रतिपादन भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. के. माने यांनी यावेळी उपस्थितांना केले.

महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने सदर कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अनिल माळी यांनी केले सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी तर आभार डॉ. प्रीती खराडे यांनी मानले. संयोजन प्रा. एस बी नावडकर यांनी केले.

Mahatma Phule Shikshan Sanstha's

# Karmaveer Bhaurao Patil College,Urun-Islampur

## Organized by Department of Geography (UG & PG)

World Ozone Depletion Day.

**Attendance Sheet** 15.09.2019

| Sr. No | Name | Sign. |
|---|---|---|
| 1) | Mali Shukranjali Jalindar | Shali |
| 2 | Bhakare Aruna Ramchandra | ABBhakare |
| 3) | Sujata Dattatraya Nerlekar | [signature] |
| 4) | Mayuri Mahesh Desai | Desai |
| 5] | Prandli Babaso Rode Patil | PBRRell |
| 6) | Sanskriti Jagannath kamble | [signature] |
| 7] | Komal kamalakar Mali | [signature] |
| 8) | Dhumak Sanjay Shripati | [signature] |
| 9) | Deshmukh sangramsinh S. | Deshmukh |
| 10) | Teli Jayashri Mahadev | Jaishri. |
| 11) | Patil omkar Nivrutti | [signature] |
| 12 | patil vrushali Ranjeet | Patil |
| 13 | Rohit laxman vathare | [signature] |
| 14 | Dr. S.K. Mali | [signature] |
| 15 | Dr. S.A. Patil. | Patil S.A. |
| 17 | Dr. A.P. Patil | A.P. Patil |

■ RNI NO. MAHMAR/2020/79996 नवे विचार...नवी सुरुवात ■ Postal Reg. No. SGL/135/2022-24

दैनिक

# हॅलो प्रभात

■ संपादक : **गणेश पाटील** (सावर्डेकर) 9011889001 ■ मानद संपादक : **चिंतामणी सहस्रबुद्धे**

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहमदनगर ■ वर्ष : ५ ■ अंक : १७० ■ शनिवार, २१ सप्टेंबर २०२४ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४

## ओझोन वायूचे संवर्धन काळाची गरज : डॉ.एस.के.माने

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

पृथ्वीवरील सजीव सृष्टीच्या अस्तित्वासाठी ओझोन वायूचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन डॉ.एस.के.माने यांनी केले. ते येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालया मध्ये आयोजित केलेल्या १६ सप्टेंबर या जागतिक ओझोन संरक्षण दिनाच्या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ओझोन अवक्षय आणि पर्यावरण या विषयावर बोलत होते.सदर कार्यक्रम पदवी व पदव्युत्तर भूगोलशास्त्र विभागाने आयोजित केला होता. ओझोन दिन हा पर्यावरणासाठी एक अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. लोकांना ओझोनच्या थराचे जतन करण्यासाठी शक्य ते उपाय शोधण्यासाठी 'जागतिक ओझोन दिन' दरवर्षी १६ सप्टेंबरला साजरा केला जातो.ओझोन थराबद्दल लोकांमध्ये जागरूकता पसरवण्यासाठी आणि ते टिकवण्यासाठी संभाव्य उपाय शोधण्यासाठी आणि वातावरणातील ओझोनचे सुरक्षा कवच राखून ठेवण्यासाठी हा दिवस लक्षवेधी ठरतो.यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी,विद्यार्थिनीव प्राध्यापक मोठ्या संख्येने सदर कार्यक्रमास उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अनिल माळी यांनी केले.